विक्रीकर आयुक्तांचे कार्यालय,
८वा मजला, विक्रीकर भवन,
माझगांव, मुंबई ४०० ०१०.

**व्यापारी परिपत्रक**

प्रति

------------------

------------------

<u>क्र. विउआ(का.व नि.)/ऊसखरेदीकर कायदा/२००९/प्रशा-६/</u> मुंबई, दिनांक २७/०५/२०११
परिपत्रक क्र.९टी २०११

**विषयः-** महाराष्ट्र ऊस खरेदीकर अधिनियम, १९६२ व महाराष्ट्र ऊस खरेदीकर नियम, १९६२ मधील सुधारणा.

**संदर्भः-** १) महाराष्ट्र अधिनियम, (२०११ चा महा. १५) दि. २१.०४.२०११.
२) महाराष्ट्र ऊस खरेदीकर अधिनियम, १९६२, नियमामध्ये सुधारणा अधिसूचना क्र. ऊखक १०११/प्र.क्र.९५/कराधान-३, दि.३०.४.२०११.
३) महाराष्ट्र ऊस खरेदीकर नियम, १९६२अधिसूचना क्र. ऊखक १०११/ प्र.क्र.१००/कराधान-३, दि.३०.४.२०११.

महोदय/महोदया,

महाराष्ट्र राज्याचा सन २०११-१२ चा अर्थसंकल्प सादर करताना, अर्थसंकल्पाच्या भाग-२ मध्ये ऊस खरेदीकर वसूल करण्याच्या पध्दतीत बदल करण्याबाबत जाहीर करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने ऊस खरेदीकर अधिनियम व नियमांत काही सुधारणा करण्यात आल्या आहेतः-

प्रस्तावित कर वसूली पध्दती करीता आपण वर्षाची परिभाषा 'वित्तीय वर्ष' (१ एप्रिल ते ३१ मार्च) या ऐवजी 'साखर वर्ष' (१ ऑक्टोबर ते ३० सप्टेंबर) अशी तरतूद केली आहे. माहे १ मे २०११ पासून प्रत्येक महिन्याला कारख्यान्यातून बाहेर पडणाऱ्या प्रत्येकी १०० किलो साखरेवर रु. ५० या दराने महिन्याभरात बाहेर पडणाऱ्या साखरेवर रक्कम निर्धारित करुन पुढील महिन्याच्या १५ तारखेपर्यंत भरावी (संदर्भ क्र.३ ची अधिसूचना).

अशा प्रमाणे भरलेली रक्कम त्या महिन्याच्या विवरणपत्रात देय असलेल्या करदायित्वासमोर समायोजित करावी. अशा समायोजने नंतर येणारी शिल्लक म्हणजेच विवरणानुसार न भरलेला कर किंवा यथास्थिती जास्तीचा भरणा पुढील महिन्याच्या विवरणपत्रात पुढे नेण्यात (carry forward) येईल. अशा पध्दतीने प्रत्येक महिन्याच्या विवरणपत्राप्रमाणे पुढे नेण्यात आलेली रक्कम सप्टेंबर महिन्यापर्यंत नेता येईल. सप्टेंबर महिन्याचे म्हणजेच वर्षा अखेरचे विवरणपत्र दाखल करताना जर मागील सर्व ओढण्यात आलेल्या (Brought forward) रकमेचा

कर भरणा येत असेल तर असा न भरलेला कर सप्टेंबर महिन्याचे विवरण दाखल करण्याच्या विहित दिनांकापूर्वी म्हणजेच ३० ऑक्टोबर पर्यंत भरावा अशा रितीने त्या साखर वर्षाच्या ऊस खरेदीकराची पूर्ण वसूली होईल. या करिता कलम ३ च्या उप-कलम(३) प्रमाणे नियम १० मध्ये तरतूद करण्यात आली आहे.

सप्टेंबर महिन्याच्या विवरणानुसार जास्तीचा भरणा केला अशी स्थिती असल्यास त्या विवरणपत्रात म्हणजे सप्टेंबरच्या विवरणपत्रात परताव्याचा दावा करावा. असा परतावा सप्टेंबर महिन्याचे विवरण सादर करण्यासाठी विहीत केलेली नियत दिनांक किंवा सप्टेंबर महिन्याचे विवरण ज्या दिनांकास सादर केले असेल यापैकी जो नंतरचा दिनांक असेल त्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आंत देण्यात येईल. या करीता कलम ७ई ची तरतूद ऊस खरेदीकर कायद्यात करण्यात आली आहे.

ऊस खरेदीकर कायद्यामध्ये 'वर्ष' ची परिभाषा दि. १ मे २०११ पासून अंमलात आणल्यामुळे पहिले साखर वर्ष ऑक्टोबर २०११ पासून सुरू होईल. या सुधारणे आधी वित्तीय वर्षाची संकल्पना असल्याकारणाने दि. १ एप्रिल २०११ ते दि. ३० सप्टेंबर २०११ या ६ महिन्याच्या संक्रमण कालावधीकरीता तरतूद करण्यात आली आहे. दिनांक १ एप्रिल २०१० ते ३० सप्टेंबर २०११ या लेखावर्षाबाबत एकच आदेश काढून निर्धारणा किंवा पुनरीक्षण करण्यात येईल अशी तरतूद करण्यात आली आहे.

इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे विवरण, कर किंवा देय असलेल्या कोणतीही रक्कम भरणे याकरीता महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ च्या व त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या तरतूदी योग्य त्या फेरफारांसह लागू करण्याबाबतची तरतूद नविन कलम ३अ नुसार करण्यात आली आहे. ही तरतूद या कलमाखाली अधिसूचना जारी केल्यावरच लागू होईल.

नविन तरतूदीनुसार नियम १० अन्वये येणारा भरणा करण्याकरीता एमटीआर-६ या चलनाचे प्रयोजन करण्यात आले आहे. दर महिन्याच्या १५ तारखेपर्यंत भरावयाची रक्कम एमटीआर-६ (MTR-6) मध्ये भरण्यात यावी. तसेच पूर्वीच्या नमुना पाच मधील विवरण, नवीन तरतूदींच्या अनुषंगाने बदलण्यात आले आहे. नियमात नवीन विवरणपत्र नमुना-पाच जारी करण्यात आले आहे. दि. १ मे २०११ पासून सुरू होणा-या कालावधीकरीता हे विवरण लागू असेल.

'वर्ष' ची व्याख्या 'साखर वर्ष' अशी सुधारणा केल्यामुळे कलम ५ अन्वये दिले जाणारे लायसन्स लगतनंतरच्या सप्टेंबर महिन्याच्या ३० तारखेसह त्या तारखेपर्यंत विधीग्राहय राहील. नियम ६ अन्वये लायसन्सचे नूतनीकरण करण्याकरिता अर्ज, नवीन तरतुदीनुसार प्रत्येक वर्षाच्या १ सप्टेंबर पूर्वी करावयाचा आहे.

हे परिपत्रक खुलासात्मक स्वरुपाचे असल्या कारणाने कायद्याच्या तरतूदींची अर्थउकल करण्यासाठी या परिपत्रकाचा वापर करता येणार नाही. जर काही शंका असल्यास स्पष्टीकरणाकरीता या कार्यालयाशी संपर्क साधावा.

आपल्याला विनंती करण्यात येते की, या परिपत्रकातील माहिती आपल्या सर्व सदस्यांच्या निदर्शनास आणावी.

आपला विश्वासू,

**(संजय भाटिया)**
विक्रीकर आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

क्र. प्रशासन-६/ मुंबई, दिनांक
परिपत्रक क्र. टी २०११

१. प्रत सादर:

(१) महाराष्ट्र राज्यतील सर्व अपर विक्रीकर आयुक्त,
(२) महाराष्ट्र राज्यतील सर्व विक्रीकर सह आयुक्त,
(३) विक्रीकर सह आयुक्त (महाविकास) यांना विक्रीकर विभागाच्या संकेतस्थळावर सदर परिपत्रक अपलोड करण्यासाठी विनंतीपूर्वक.
(४) महाराष्ट्र राज्यतील सर्व ज्येष्ठ विक्रीकर आयुक्त,
(५) महाराष्ट्र राज्यतील सर्व विक्रीकर उप- आयुक्त,
(६) महाराष्ट्र राज्यतील सर्व सहाय्यक विक्रीकर आयुक्त,
(७) महाराष्ट्र राज्यतील सर्व विक्रीकर अधिकारी,

२. प्रत माहितीकरीता रवाना:

(१) उप-सचिव,वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
(२) अवर सचिव, वित्त विभाग मंत्रालय, मुंबई.
(३) लेखा अधिकारी, विक्रीकर महसूल लेखा परिक्षण मुंबई आणि नागपूर
(४) विक्रीकर आयुक्त महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयातील सर्व कार्यासन व कार्यासन अधिकारी यांना प्रत.

**(जी. बी. इंदूरकर)**
विक्रीकर सह आयुक्त (मुख्यालय)१,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.